दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७० • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 14 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 170 • Pages 4 • Rate 4 Rs

## सरकारच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार

**मुंबई**–काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. केवळ अन्न व नागरी पुरवठाच नाही, तर सरकारमधील प्रत्येक विभागात भ्रष्टाचार सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. नरहरी झिरवळ हे आदिवासी असल्याने त्यांच्यावर सापळा रचण्यात आल्याचे पटोले म्हणाले.सरकार स्वतःला स्वच्छ दाखवण्याचा प्रयत्न करत आहे, पण प्रत्येक विभागात पैसे घेतल्याशिवाय सह्या होत नाहीत, हे उघड सत्य आहे, असे पटोले यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना सांगितले.यावेळी पटोले यांनी जळगाव जिल्ह्यातील २१६ कोटी रुपयांच्या केळी पीक विमा घोटाळ्याचा मुद्दाही उपस्थित केला. सॅटेलाईटच्या मदतीने हा घोटाळा उघडकीस आला असून, पीक नसतानाही हजारो बनावट अर्ज दाखल करण्यात आले होते. या घोटाळ्यात सरकारचा सहभाग असल्याचा आरोप त्यांनी केला.प्रामाणिक शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळाला नाही, तर बीड आणि जळगावमध्ये सरकारी हिस्सेदारांना सरकारच्या माध्यमातून पीक विमा दिला जातो, असे पटोले म्हणाले.

# महा पशुधन एक्सपोतून ग्रामीण तरुणांना उद्योजक बनण्याची संधी-ना.पंकजाताई मुंडेंचे तरुणांना आवाहन

## राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक 'महा पशुधन एक्सपो'चे परळीत उद्घाटन

### मुंडे साहेबांची उणीव अन् अजितदादांची आठवण..

प्रत्येक कार्यक्रमात लोकनेते मुंडे साहेबांची उणीव आम्हाला जाणवते. ही त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यांचे स्मरण आपल्याला सदैव होत असते, त्याच पद्धतीने आज आपल्या बीड जिल्ह्याला विकासाच्या नव्या दिशेने घेऊन जाणारे राज्याचे उपमुख्यमंत्री व आपले पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आज महा पशुधन एक्सपो बघण्यासाठी अजितदादा असते तर त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या असत्या आणि कौतुकही केले असते. तर मुंडे साहेब असते तर हे सर्व मला करावेच लागले नसते, त्यांनीच हे केले असते. परंतु दुःखाच्या प्रसंगांवर पाय देत पुढे जाण्याचे बळ ईश्वर देतो. लोकांसाठी केलेली कामेच खऱ्या अर्थाने कामी येतात. त्याच मार्गावर लोकहिताची कामे आपल्या हातून घडावी असा आपला सातत्याने प्रयत्न असल्याचे ना पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

### कृषीचा दर्जा मिळाल्याने पशुपालकांना आता सवलत


महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा दिला. आता पशुपालकांना कर्जावरील व्याजदर कृषीप्रमाणेच मिळणार आहे. तीन लाखांपर्यंत व्याजावर अनुदान, सौरऊर्जेसाठी सबसिडी, वीज बिलात सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील.५० टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध असून एक कोटी रुपयांच्या प्रकल्पावर ५० लाखांपर्यंत सबसिडी मिळू शकते. बकरीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन अशा उद्योगांत तरुणांनी उतरावे. कमी जमिनीतही आधुनिक पद्धतीने बहुउद्देशीय शेती करता येते. यासाठी तरुणांनी पुढे यावे आणि पशुसंवर्धनाच्या क्षेत्रातून रोजगार निर्मितीच्या माध्यमातून आपली आर्थिक उन्नती करून घ्यावी असे आवाहन ना पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

### प्रदर्शनातील विविध स्टॉलला भेट; पशूपालकांना दिले प्रोत्साहन

प्रदर्शन स्थळी येताच ना. पंकजाताई मुंडे, आ. धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांसमवेत महापशुधन एक्सपोमधील विविध पशुधन स्टॉलला भेट देत बारकाईने पाहणी केली व पशू पालकांना प्रोत्साहित केले. ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गोपूजन, नंदीबैल पूजन करून विविध स्टॉल्सचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. एक्सपो मध्ये सहभागी झालेल्या विविध जातीवंत पशुधनांची माहिती, त्यांची वैशिष्ट्ये आदींची माहिती घेतली. मुख्य सभागृहात औपचारिक पद्धतीने उद्घाटन समारंभ अतिशय उत्साहात पार पडला. प्रारंभी प्रतिमा पूजन, दीपप्रज्वलन, राष्ट्रगीत व राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### कामे मागण्यापेक्षा गायी, म्हशी, कोंबड्या, बकऱ्या, मेंढ्या मागा

ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारा आणि पशुपालकांसाठी मोठी संधी निर्माण करणारा हा 'महा पशुधन एक्सपो' परळी वैजनाथच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणार आहे याचा लाभ घ्या. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने विविध आर्थिक मदतीच्या व अनुदानाच्या योजना आहेत त्याची माहिती घ्या. पशुपालनाच्या व्यवसायात उतरा आणि उद्योगी बना असे आवाहन करत त्यांनी तरुणांना पशुसंवर्धनाकडे वळण्याची साद घातली. त्याचप्रमाणे मिश्किलपणाने कार्यकर्त्यांना संदेश देत राजकीय नेत्यांच्या मागे काम द्या, काम द्या म्हणून फिरण्यापेक्षा शेतीपूरक पशुसंवर्धनाच्या उद्योगांमध्ये उतरा असा संदेश दिला. मला कामे मागण्यापेक्षा स्वतःच्या पायावर कायमस्वरूपी उभे राहण्यासाठी गाई ,म्हशी, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, मागा आणि आपली उन्नती करा असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या.





दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे पहिले राज्य ठरलेले आहे. आपले अनुकरण आता देशातील अनेक राज्ये करत आहेत. पशुसंवर्धनासाठी तीन लाखांपर्यंत व्याजावर अनुदान, सौर ऊर्जेसाठी सबसिडी, वीज बिलात सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील. पशुसंवर्धनातून उन्नती हे ध्येय निश्चित करून अधिकाधिक रोजगार निर्मिती करण्याच्या दृष्टीने अनेक योजना पशुसंवर्धन विभागाच्या वतीने कार्यान्वित करत आहोत. हा एक्सपो ग्रामीण तरूणांना उद्योजक बनण्याची एक संधी असून प्रत्येकानं प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घ्यावी आणि पशुपालनाच्या उद्योगासाठी सज्ज व्हावे असे आवाहन राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन दिवसीय ऐतिहासिक 'महापशुधन एक्सपो'चे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज वैद्यनाथ महाविद्यालया समोरील ओपळे मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडले, त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी, पशुसंवर्धन आयुक्त डॉ.प्रवीण कुमार देवरे,अतिरिक्त आयुक्त डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील आदी यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, मी ग्रामविकास मंत्री, बीडची पालकमंत्री असताना बीड जिल्ह्यामध्ये जो निधी कधी कोणाला माहिती नव्हता अशा २५ १५ निधीतून प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर कामे केली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या इमारती उभ्या केल्या. माझा जिल्हा दुष्काळी आहे, मागासलेला आहे असे म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही तर याउलट लोकांसाठी कामे करण्याची मोठी संधी आपण यातुन बघितली पाहिजे. त्यादृष्टीनेच पशुसंवर्धन मंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा आपण या ठिकाणी साडे पाचशे कोटीचे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. ज्यावेळी बारामतीसाठी पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याचा प्रस्ताव अजितदादांनी दिला.त्यावेळी मी बीड जिल्ह्यासाठी परळीत हे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. अजितदादांनी यासाठी निधी मंजूर केला. पशुसंवर्धन मंत्री या नात्याने देशातील ऐतिहासिक महा पशुधन एक्सपो आपल्या जिल्ह्यात व्हावा, आपल्या परळीत व्हावा अशी माझी मनोमन इच्छा होती. आता हा एक्सपो आयोजित करताना मला आनंद होत आहे. हा एक्स्पो तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा आहे असे त्या म्हणाल्या.

# एसआरटी परिसरातील बीओआयचे एटीएम कायम बंद; रुग्ण व नातेवाईकांना मोठा मनस्ताप

## मशीन तात्काळ सुरू करण्याची नागरिकांची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ (एसआरटी) रुग्णालय परिसरातील बँक ऑफ इंडिया (बीओआय)चे एटीएम मशीन गेल्या काही दिवसांपासून सतत बंद अवस्थेत असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामनाकरावा लागत आहे.रुग्णालयात दाखल असलेल्या पेशंट च्या नातेवाईकांना औषधे, तपासण्या व इतर तातडीच्या खर्चासाठी रोखरकमेची आवश्यकता असते.मात्र एटीएम बंद असल्यामुळे त्यांना शहरात इतरत्र जाऊन पैसे काढावे लागत असून वेळ व पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे.




विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक फटका बसत आहे.अनेक वेळा आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ रोख रक्कम आवश्यक असताना एटीएम बंद असल्याने नातेवाईकांची धावपळ होत आहे.त्यामुळे रुग्ण सेवेवरही अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यापार्श्वभूमीवर बीओआय बँक प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन एटीएम मशीन नियमित सुरू ठेवावे व योग्य देखभाल करावी,अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणी ठेवी परत मिळवून देण्याची मागणी

## छावा मराठा संघटनेचे शिवाजी दादा ठोंबरे यांचे समाजकल्याण मंत्र्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट तसेच जिल्ह्यातील इतर मल्टीस्टेट संस्थांमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ परत मिळावेत,तसेच जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या लिलावाची तारीख जाहीर करावी, अशी मागणी छावा मराठा संघटना,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात समाजकल्याण मंत्री मा. संजयजी शिरसाट यांना दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी निवेदन देण्यात आले.या निवेदनात ज्ञानराधा मल्टीस्टेटसह इतर मल्टीस्टेट संस्थांमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ परत मिळावेत,अशी ठाम भूमिका मांडण्यात आली आहे.तसेच जप्त करण्यात आलेल्या सर्व मालमत्तेच्या लिलावाची तारीख जाहीर करावी, संचालक व नातलग यांच्या नावावर असलेली मालमत्ता जप्त करावी, डेअरी व फळबाग डेअरी जप्त करावी आणि ज्ञानराधा मल्टीस्टेटचे फॉरेन्सिक ऑडिट तात्काळ करण्यात यावे, अशा विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.संघटनेने इशारा दिला आहे की, मागण्या तात्काळ मान्य न केल्यास कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.या निवेदनावर संघटनेच्या सरचिटणीस बाबर आसाराम आकाश, शिरसाठ महादेव राऊत, औसेकर आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून जिल्हा प्रमुख यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण चिठ्ठी विभागात सावळा गोंधळ सुट्ट्या पैशांच्या नावाखाली रुग्ण नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक?

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ (स्वा. रा.ती.) ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथील बाह्यरुग्ण (ओपीडी)चिठ्ठी विभागात सुट्ट्या पैशांच्या कारणावरून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. वीस रुपयांची ओपीडी चिठ्ठी काढण्यासाठी रुग्ण नातेवाईकांनी शंभर किंवा पन्नास रुपयांची नोट दिल्यास संबंधितकर्मचारी सुट्टे पैसे देण्यास नकार देत असल्याची तक्रार आहे.मिळालेल्या माहितीनुसार,सुट्टे नाहीत, नंतर या असे सांगून रुग्णांना परत पाठवले जाते.मात्र तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित कर्मचारी ड्युटी संपवून निघून जातात.परिणामी, रुग्ण नातेवाईकांना दिलेल्या रकमेचे उर्वरित पैसे मिळत नाहीत.अनेक वेळा रुग्णांची तपासणी, औषधोपचार व इतर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चिठ्ठी विभागातील कर्मचारी उपलब्ध नसल्याने रुग्णांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे.गरीब, शेतकरी व ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांसाठी वीस-तीस रुपयेही महत्त्वाचे असतात. अशापरिस्थितीत सुट्ट्या पैशांच्या कारणा वरून होणारी ही अडवणूक म्हणजे आर्थिक पिळवणूकच असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.रुग्णालय प्रशासनाने या प्रकाराची तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागात पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, सुट्ट्या पैशांची स्वतंत्र सोय करावी किंवा डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.शासकीय रुग्णालय हे सर्वसामान्यांचे आधारस्थान असताना अशा प्रकारांमुळे रुग्णांचा विश्वास डळमळीत होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.रुग्ण नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवून जबाबदार अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.



# संपादकीय

## व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण?

फेब्रुवारीचा महिना आला की हवेत एक वेगळीच ऊब पसरते. गुलाबांची पाकळी, चॉकलेट्सची गोडी, शब्दात न मावणाऱ्या भावना आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं. या साऱ्यांचा एकत्रित उत्सव म्हणजे व्हॅलेंटाईन डे. काहींसाठी तो फक्त एक दिवस असतो पण अनेकांसाठी तो संपूर्ण आयुष्याची आठवण करून देणारा क्षण असतो. प्रेम म्हणजे केवळ गुलाब, कार्ड्स आणि सोशल मीडियावरचे स्टेटस नाही, तर तो माणसाच्या अस्तित्वाचा आत्मा आहे, जो श्वासासोबत आत जातो आणि नात्यांमधून बाहेर प्रकट होतो. प्रेम हे कोणत्याही एका दिवसापुरते मर्यादित नसते. तरीही व्हॅलेंटाईन डे चे महत्त्व नाकारता येत नाही. कारण हा दिवस आपल्याला थांबवतो धावपळीच्या, स्वार्थी, स्पर्धात्मक जगात थोडा वेळ स्वतःकडे आणि आपल्या माणसांकडे पाहायला भाग पाडतो. आपण प्रेम करतो का? यापेक्षा आपण प्रेम व्यक्त करतो का? हा प्रश्न या दिवशी अधिक ठळक होतो.आजच्या काळात प्रेमालाही बाजारपेठेचा रंग चढला आहे. गिफ्ट्सची किंमत, रेस्टॉरंट्सचे पॅकेजेस, सोशल मीडियावरील 'परफेक्ट कपल' फोटो या सगळ्यात प्रेम हरवत चालले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण प्रेम कधीच वस्तू नव्हते आणि कधीच होणार नाही. प्रेम म्हणजे दोन माणसांमधील न दिसणारा करार एकमेकांना समजून घेण्याचा, स्वीकारण्याचा आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देण्याचा. भारतीय संस्कृतीत प्रेमाला नेहमीच गहिरे, शांत, संयमी रूप दिले गेले आहे. सावित्रीचे सत्यवानावरील प्रेम, राधा–कृष्णाची अध्यात्मिक जवळीक, मीरा आणि विठ्ठलाचे भक्तिपूर्ण नाते ही प्रेमाचीच विविध रूपे आहेत. आज मात्र प्रेमाला फक्त रोमँटिक चौकटीत अडकवले जाते. प्रत्यक्षात प्रेम हे आईच्या काळजीत असते, वडिलांच्या न बोलणाऱ्या त्यागात असते, मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असते आणि वृद्धांच्या डोळ्यातल्या शांततेत असते.व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेमाचा हा व्यापक अर्थ पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे. प्रेम म्हणजे केवळ 'तू माझा किंवा माझी' एवढेच नव्हे, तर 'मी तुझ्यासाठी आहे' हे निःस्वार्थी भावनेतून उमटलेले वाक्य आहे. प्रेमात अधिकार असतो, पण मालकी नसते. प्रेमात अपेक्षा असतात, पण अटी नसतात. प्रेमात राग असतो, पण तोही जपणुकीचा असतो. आजच्या तरुणाईवर अनेकदा प्रेमाबाबत आरोप केले जातात की ते उथळ आहे, क्षणिक आहे, दिखाऊ आहे. पण सत्य असे आहे की आजची पिढी प्रेम व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहे. त्यांच्या भाषेत प्रेम आहे, त्यांच्या संगीतामध्ये प्रेम आहे, त्यांच्या कविता आणि मेसेजेस मध्ये प्रेम आहे. दोष प्रेमाचा नाही, तर प्रेम समजून न घेणाऱ्या समाजाचा आहे. प्रेमाला विरोध करणारे अनेक आवाज आजही समाजात आहेत.व्हॅलेंटाईन डे म्हणजे 'पाश्चात्त्य संस्कृती' असा शिक्का मारून प्रेम व्यक्त करणाऱ्यांना दोषी ठरवले जाते. पण प्रेमाला संस्कृती नसते; प्रेम ही माणसाची मूलभूत गरज आहे. संस्कृती जर प्रेमाला नाकारत असेल, तर त्या संस्कृतीला पुन्हा तपासण्याची गरज आहे. प्रेम हे बंडखोर असते ते जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती या सगळ्या भिंती ओलांडते. म्हणूनच कदाचित प्रेमाला नेहमीच विरोध झाला आहे. कारण प्रेम प्रश्न विचारते, रूढी मोडते आणि माणसाला माणूस म्हणून उभे करते. व्हॅलेंटाईन डे हा त्या बंडखोरीचा शांत, सुंदर उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात नात्यांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. मोबाईलमध्ये हजारो संपर्क असले तरी मनात जवळीक कमी होत आहे. अशा वेळी व्हॅलेंटाईन डे आपल्याला आठवण करून देतो की, प्रेमासाठी वेळ काढावा लागतो, संवाद साधावा लागतो, आणि कधी कधी स्वतःला बाजूला ठेवावे लागते. खरे प्रेम मोठ्या शब्दांत व्यक्त होत नाही; ते छोट्या कृतींमध्ये दिसते. थकलेल्या जोडीदारासाठी केलेला चहा, मित्राच्या अपयशात दिलेली शांत साथ, आई–वडिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारी एक साधी भेट, हेच प्रेमाचे खरे क्षण आहेत. व्हॅलेंटाईन डे हा अशा क्षणांची उजळणी करण्याचा दिवस आहे. आज प्रेमालाच टिकून राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो. नाती तुटतात, विश्वास ढासळतो, आणि लोक एकमेकांपासून दूर जातात. पण तरीही प्रेम संपत नाही. कारण प्रेम हे शेवटी आशेवर उभे असते उद्या सगळं बरं होईल या विश्वासावर. व्हॅलेंटाईन डे हा त्या आशेचा उत्सव आहे. प्रेम हे परिपूर्ण नसते. त्यात चुका असतात, मतभेद असतात, वेदना असतात. पण तरीही प्रेम सोडून देण्यापेक्षा त्याला समजून घेणे महत्त्वाचे असते. प्रेम म्हणजे प्रत्येक वेळी जिंकणे नाही, तर कधी कधी हरूनही एकत्र राहणे असते.व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने समाजाने एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, प्रेमाला स्वीकारले तरच माणुसकी टिकेल. द्वेष, हिंसा, असहिष्णुता यांच्यावर मात करण्याची ताकद फक्त प्रेमात आहे. प्रेमाशिवाय कोणतीही क्रांती टिकू शकत नाही, कोणतीही संस्कृती फुलू शकत नाही. आज गरज आहे ती प्रेमाला मोकळा श्वास घेऊ देण्याची. प्रेम करणाऱ्यांना प्रश्न विचारण्याऐवजी त्यांना समजून घेण्याची. कारण प्रेम दडपले गेले की ते वेदनेत बदलते, आणि स्वीकारले गेले की ते जीवनात बदल घडवते. व्हॅलेंटाईन डे म्हणजे फक्त प्रेमींचा दिवस नाही; तो माणसाचा दिवस आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक नात्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, प्रेम व्यक्त करण्याचा आणि थोडे अधिक माणूस होण्याचा दिवस आहे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, प्रेम नेहमी जवळ असतेच असे नाही. कधी ते अंतरात असते, कधी आठवणीत, कधी न बोललेल्या शब्दांत. विरह म्हणजे प्रेमाचा अभाव नसतो; तो तर प्रेमाचीच सर्वात प्रामाणिक परीक्षा असते. ज्याची ओढ लागते, ज्याची आठवण मनाला थकवते आणि तरी ही ज्याच्यासाठी मन प्रार्थना करत राहते, तेच खरे प्रेम. काही प्रेमकथा हातात हात घालून पूर्ण होतात, तर काही डोळ्यांत पाणी ठेवून अपूर्णच राहतात. पण अपूर्णततेही जे जिवंत राहते, जे काळाच्या ओघातही मनात सलत राहते, तेच प्रेम अमर असते. कारण प्रेम मिळण्यात नसते; ते थांबण्यात, वाट पाहण्यात आणि आठवणी जपण्यात असते. व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबामागे कधी कधी एक न बोललेली हुरहूर असते, चॉकलेटच्या गोडीमागे एखादी न व्यक्त झालेली वेदना असते. तरीही माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो, कारण विरहही सांगून जातो की, आपण कुणावर तरी मनापासून प्रेम केले होते. प्रेम जवळ असो वा दूर, समोर असो वा आठवणीत ते जर खरं असेल तर ते मनाला अधिक माणूस बनवतं आणि म्हणूनच, प्रेम हरवले तरी त्याची आठवण जपा; कारण काही नाती आयुष्यात साथ देत नाहीत, पण आयुष्यभर अर्थ देऊन जातात. प्रेमाला एक दिवस पुरेसा नसतो, पण एक दिवसही निरर्थक नाही. कारण कधी कधी एक दिवसच आयुष्यभराची दिशा ठरवतो. प्रेम करा, व्यक्त करा आणि जपा, कारण प्रेम हेच खरं शाश्वत सत्य आहे. तुमचं आयुष्य प्रेमाने, आपुलकीने आणि सुंदर नात्यांनी नेहमी फुलत राहो, भावनांना शब्द मिळोत आणि शब्दांना अर्थ. व्हॅलेंटाईन डे च्या मनापासून शुभेच्छा!

प्रेम करा
जुळले नाही तरी चालेल,
भेट झाली नाही तरी चालेल–
पण मनातलं प्रेम खोटं ठरू देऊ नका.
कारण विरहातही जे उजळतं,
तेच खरं, शाश्वत प्रेम असतं.

**प्रविण बागडे,नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# केज नगरपंचायत घरकुल घोटाळा व कानडी रोड प्रश्नावर मंगळवारी केविसंसचे रास्ता रोको आंदोलन

दैनिक वादळ वाता
केज । प्रतिनिधी

केज येथील नगरपंचायत अंतर्गत शेकडो घरकुल निधी वाटपाचा भ्रष्टाचार, जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या मालकीची जागा अन्य कामासाठी ताब्यात घेण्यासाठी केज नगर पंचायतने घेतलेला ठराव रद्द करणे व अनेक दिवस प्रलंबित असलेले कानडी रस्त्याचे दुरुस्ती काम तात्काळ करावे या मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीने येत्या मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६रोजी जनतेच्या सहभागाने शहर अंतर्गत महामार्गांवर कानडी चौक येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्याचाइशारा दिला आहे.केज नगर पंचायत अंतर्गत म्हाडा ने एकूण ३७४ लाभार्थ्यां साठी घरकुल मंजूरकरून त्यासाठी ४ कोटी ४८ लाख ८० हजार एवढा निधी दि. १८ऑगस्ट २०२१ व दि.६फेब्रुवारी २०२३ च्या पत्रकान्वये मंजूर केलेला आहे. त्यापैकी फक्त १३३ लाभार्थ्यांना वरील रकमेतून लाभ मिळाला आहे.यातीलही कांही लाभार्थ्यांना अद्याप कांही हप्ते मिळालेले नाहीत. उर्वरित २४१ गोरगरीब पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर असताना ही कसलाही लाभमिळालेला नाही.हे प्रकरण लेखापाल महारुद्र वडकर यांनी तपशीलवार लेखापरीक्षण करून अहवालाच्या रूपाने दि.१७ नोव्हेंबर २०२५ रोजी केज नगर पंचायतला कळवले होते. तरीही ते सार्वजनिक व्हायला चार महिने लागले.हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून यामध्ये गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांच्या हक्काचे करोडो रुपये प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगणमताने घशात घातले आहेत.वर वर या प्रकरणात केवळ प्रशासकीय अधिकारी गुंतलेले दिसत असले तरी एवढा मोठा भ्रष्टाचार करण्यासाठी यामध्ये अधिकाऱ्यांना राजकीय लोकप्रतिनिधीचा सहभाग असून ते देखील यात वाटेकरी असावेत असा अंदाज आहे.त्यामुळे या प्रकरणाची उच्यस्तरीय चौकशी करून दोषींवर




कार्यवाही करण्याची मागणी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केली आहे.समितीने केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या मालकीच्या जागेवर ताबा मिळवण्यासाठी केज नगर पंचायतने घेतलेला ठराव केज नगर पंचायत ने तात्काळ रद्द करून तसे सर्व संबंधित वरिष्ठ कार्यालयास कळवण्याची मागणीही केली आहे.ही जागा शिक्षण विभागाची असून या शाळेच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी ही शाळा पुन्हा गतवैभवात नेण्याची जोरदार प्रयत्न सुरु केले असून त्यासाठी संपूर्ण तयारी करण्यात आली आहे.त्याकरिता केज नगरपंचायत ने पूर्वीचा ठराव रद्द करून तसे पत्र समितीला देण्याची मागणी केली आहे.या शिवाय केज शहरातील कानडी रोड गेली कांही महिन्यापासून केज नगरपंचायतने पाईप लाईन साठी खोदकाम करून ठेवला आहे.पाईप लाईन टाकुन कांही आठवडे झाले तरी अद्याप रस्त्याच्या दुरुस्तीचे काम झालेले नाही.यासाठी समितीने जनतेच्या सहभागाने आंदोलनेही केली आहेत मात्र समस्या सुटलेली नाही.वरील सर्व समस्या येत्या आठ दिवसात न सोडवल्यास समिती येत्या मंगळवार दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शहर अंतर्गत महामार्गांवर राष्ट्रसंत भगवान बाबा चौक,कानडी चौक येथे लोकांच्या सहभागाने रास्ता रोको आंदोलन करणार आहे.वरील सर्व बाबी व समस्या गंभीर स्वरूपाच्या असल्याने त्या सोडवण्यासाठी आंदोलना शिवाय पर्याय नाही असे समितीचे मत बनले असून या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिणामास संबंधित शासकीय यंत्रणा जबाबदार राहील असा इशारा समितीचे समन्वयक व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.या आंदोलनात अन्याय झालेले सर्व घरकुल लाभार्थी,शिक्षणप्रेमी आणि कानडी रोड परिसरातील सर्व व्यापारी व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ही समितीच्या वतीने हनुमंत भोसले यांनी केले आहे.

या निवेदनावर हनुमंत भोसले,भाई मोहन गुंड, नासेर मुंडे,शेषराव घोरपडे,इंजि.मोहनराव कराड व महेश जाजू यांची नावे आहेत.

# परभणीत भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी काँग्रेसने शिवसेना (उबाठा)ला पाठिंबा देऊन आघाडी धर्म पाळला: हर्षवर्धन सपकाळ

## चंद्रपुरात शिवसेना (उबाठा)ने घेतलेली भूमिका चुकीचीच,पक्षपातळी वरून चुकीचे होणारे समर्थन काँग्रेस कदापी खपवून घेणार नाही

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

चंद्रपुरात शिवसेना (उबाठा)ने भाजपाला पाठिंबा देऊन आघाडीचा धर्म पाळला नाही पण काँग्रेसने मात्र परभणी महापौरपदाच्या निवडणुकीत आघाडीचा धर्म पाळला आहे. परभणीमध्ये शिवसेना (उबाठा)चा महापौर व काँग्रेसचा उपमहापौर झाला आहे. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी, इंडिया आघाडी, मविआ, लोकशाही तसेच संविधानासाठी काँग्रेसच्या सर्व १२ नगरसेवकांनी शिवसेना (उबाठा)ला मतदान केले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, चंद्रपूर महानगरपालिकेत शिवसेना (उबाठा) ने जी भूमिका घेतली त्याची सल असण्याची अथवा बदला घेण्याची भूमिका व संस्कृती काँग्रेसची नाही. चंद्रपुरात शिवसेना (उबाठा)चे ८ नगरसेवक असताना त्यांनी भाजपाला मतदान केले हे राजकीय दृष्टीकोनातून चुकलेले आहे, आणि त्याचे पक्ष पातळीवरून समर्थन केले जाते, काँग्रेसची लाज काढली जाते, या चोराच्या उलट्या बोंबा आहेत.

चंद्रपुरसंदर्भात खासदार संजय राऊत यांच्यासोबत काँग्रेसच्या नेत्यांनी चर्चा केली होती, काँग्रेसचे नेते शिवसेना (उबाठा) शी सातत्याने संपर्कात होते असे असताना संजय राऊत व त्यांच्या पक्षातील लोकांनी जी वक्तव्ये केली ती चुकीची असून, आघाडी धर्माला शोभणारी नाहीत. वंचित बहुजन आघाडी हा काँग्रेसचा मित्र पक्ष आहे, त्यांचे २ नगरसेवकर गैरहजर राहिले, त्यांना पक्षाने बडतर्फ केले तसेच शहराध्यक्षांवरही कारवाई केली पण (शिवसेना)उबाठाने मात्र कोणतीच कारवाई केली नाही, उलट त्याचे समर्थन केले, हे काँग्रेस पक्ष कदापी सहन करणार नाही.परभणीत काँग्रेसचा महापौर करण्यासंदर्भात आमच्याकडे प्रस्ताव होता पण सत्तेसाठी वाट्टेल ते ही काँग्रेस पक्षाची भूमिका नाही. आम्ही सत्तेला लाथाडून आघाडी धर्म पाळला व शिवसेना (उबाठा)च्या पाठीशी उभे राहिलो. आघाडीत शिवसेना(उबाठा) काँग्रेसची मते घेते पण काँग्रेसला मत देत नाही यावर चंद्रपूर व परभणीतील घडामोडींनी शिक्कामोर्तब केले आहे, असेही सपकाळ म्हणाले.



# कोळी समाजाचा मला नितांत आदर–महेंद्रशेठ घरत

## केडीएच स्पोर्टस वाघिवली वाडा संघ ठरला विजेता



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

समुद्राच्या तुफान लाटांशी झुंजणारा कोळी बांधव आपली संस्कृती जपणारा समाज आहे. त्यामुळे कोळी समाजाचा मला नितांत आदर आहे. भूमिहीन शेतमजूर आहेत त्यांना सिडकोचे साडेबारा टक्के भूखंड मिळाले पाहिजेत, ही दिबांची भूमिका होती, पण त्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने आजही झालेली नाही, हे दुर्दैव आहे. मैदाने नसतील तर येणारी पिढी खेळणार कुठे, त्यामुळे मैदानांसाठी सर्वांनीच पुढे या, आपण भूमिपुत्र आहोत, आपला पहिला हक्क आहे. लढल्याशिवाय काहीच मिळत नाही. त्यामुळे मी आपल्यासोबत आहे. गावातील तरुणांनी पुढे यावे, घरे बांधावीत, गरजेनुसार घरांची गरज आपल्यालाही आहे. सत्ताधाऱ्यांना मूलभूत सुविधांचा विसर पडलेला आहे, असे महेंद्रशेठ घरत उरण येथील कुंडेगाव येथे म्हणाले. श्री गणेश हनुमान क्रिकेट क्लब कुंडेगाव कोळीवाडा यांनी काँग्रेस चषक आयोजित केला होता. त्यावेळी महेंद्रशेठ बोलत होते.त्यावेळी ते क्रिकेटपटूंशी संवाद साधताना म्हणाले, परप्रांतीय येतील, झोपड्या बांधतील, सरकार त्यांना फुकटात घरे देईल, असेच सध्या सुरू आहे. त्यामुळे भूमिपुत्रांनो, सावध व्हा आणि वाढत्या गरजेनुसार घरे बांधा. कुंडेगावातील तरुणांनी पहिल्यांदाच प्रकाशझोतातील क्रिकेट सामने ठेवले, उत्तम आयोजन केले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. पालघर–वाडा येथे राज्यस्तरीय ब्रास बँड स्पर्धेत कुंडेगाव येथील जय हनुमान कला सर्कल ब्रास बँड पथकाला द्वितीय क्रमांक मिळाला. त्याबद्दल महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले. काँग्रेस कमिटीच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांचे ब्रास बँडने स्वागत केले आणि यथोचित सन्मान केला.यावेळी केडीएच स्पोर्टस वाघिवली वाडा संघ विजेता ठरला; तर सुरुंग पाडा, फुंडे, पागोटे या संघानीही द्वितीय, तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळविली. यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, सरपंच सविता मढवी, भजन गायक लक्ष्मण पाटील, ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष अजय पाटील, अंगद ठाकूर, भालचंद्र चोगले, चंद्रकांत ठाकूर, राजेश ठाकूर, कल्पेश पाटील, सतीश पाटील आदी उपस्थित होते.

# अजितदादांनंतर सुनेत्रा पवारांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजनाची पहिली बैठक:अजितदादांची उणीव; १६०० कोटी वाढीव निधीची मागणी



दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठा बदल झाला. त्यांच्या जागी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि पुण्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारीही स्वीकारली. या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक आज त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अजित पवारांच्या अनुपस्थितीत ही बैठक होत असल्याने वातावरणात भावनिक छटा होती. पुणे विभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती, तर सुनेत्रा पवार मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाल्या.या बैठकीला पुणे जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याच्या विकास आराखड्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अजित पवार पालकमंत्री असताना ज्या पद्धतीने नियोजनाला गती मिळत होती, त्याच धर्तीवर काम सुरू ठेवण्याचा निर्धार बैठकीत दिसून आला. बैठकीनंतर राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांनी माध्यमांशी संवाद साधत चर्चेचा आढावा दिला.शेळके यांनी सांगितले की, अजित पवार नसताना झालेली ही पहिली बैठक असल्याने सर्वांना त्यांची उणीव जाणवली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ऑनलाइन सहभागी झाल्या होत्या, तर इतर मंत्री आणि नेते प्रत्यक्ष उपस्थित होते. शहरी आणि ग्रामीण भागातील विकासासाठी निधीचे संतुलित वाटप कसे करावे, यावर विचारमंथन झाले. विशेषतः सौरऊर्जा प्रकल्प आणि आदिवासी भागांसाठी अधिक निधी देण्याचा मुद्दा पुढे आला.बैठकीत मुख्यमंत्रींकडे १ हजार ६०० कोटी रुपयांच्या वाढीव निधीची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे शेळके यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी हा निधी आवश्यक असल्याचे मत बैठकीत व्यक्त झाले. अजित पवारांनी सुरू केलेल्या कामांची सातत्याने अंमलबजावणी व्हावी, यावरही सर्वांचे एकमत झाले.विमान अपघाताच्या संदर्भात बोलताना शेळके यांनी संयमाची भूमिका मांडली. घटनेच्या दिवशीच एसआयटी स्थापन करण्यात आली असून तपास सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. जबाबदार व्यक्तींनी जबाबदारीनेच बोलावे, या घटनेकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये, असा त्यांनी संदेश दिला. अजित पवार हे मूळतः रस्त्याने जाणार होते, मात्र उशीर झाल्यामुळे त्यांनी विमानाचा पर्याय निवडला, असेही त्यांनी नमूद केले.

# होट्टल चालूक्य राजधानी तिर्थक्षेत्रात महाशिवरात्री निमित्त भव्य आरोग्य सेवा आणि रक्तदान शिबिर

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

मानव सेवा हीच खरी ईश्वर भक्ती या उक्तीप्रमाणे, महाशिवरात्रीचे औचित्य साधून होट्टल भूमिपुत्र आणि समस्त ग्रामस्त यांच्या सौजन्याने एक स्तुत्य सामाजिक उपक्रम!उपक्रमाचे स्वरूप:मोफत आरोग्य तपासणी: तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्व प्रकारच्या आजारांची मोफत तपासणी.

मोफत औषधोपचार: तपासणीनंतर गरजू रुग्णांना आवश्यक औषधांचे मोफत वाटप.

भव्य रक्तदान शिबिर: आपले रक्त, कोणाचे तरी प्राण वाचवू शकते. या रक्तदान शिबिरात आपले योगदान आवश्य द्यावे .

वेळ आणि ठिकाण:दिनांक: १५/०२/ २०२६ वार रविवार

वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत

स्थळ: सिध्देश्वर मंदिर होट्टल.

नम्र आवाहन:




कार्यक्रमाचे उदघाटक मा श्री भरत सुर्यवंशी तहसिलदार देगलूर

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा, श्री गोपाळ सर नाईक जागृती विद्यालय होट्टल मुख्यध्याक

प्रमुख पाहूणे डॉं. नरेश देवणीकर वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा आआरोग्य विभाग देगलूर

मा. श्री रवि हुडेंकर

पोलिस निरिक्षक मरखेल पोलिस स्टेश या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा भव्य आरोग्य शिबिराचे कार्यक्रम होणार असून पंचपुर्यातील ग्रामस्थानी आवश्य या शिबिराचे लाभ घ्यावी असे होट्टल चालूक्य राजधानी सामाजिक सेवा प्रतिष्ठान कडून विनंती करण्यात आले आहे.

होट्टल परिसरातील सर्व नागरिक आणि भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. तसेच, जास्तीत जास्त तरुणांनी रक्तदान करून या विधायक कार्यात सहभागी व्हावे, ही विनंती.

**तज्ज्ञ डॉक्टर**

१ डॉ. किरण माधवराव बिरादार (MBBS, MD) – हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ
(श्वास हॉस्पिटल, देगलूर)
२ डॉ. प्राची पत्तेवार (MBBS, DGO) – स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ
(पत्तेवार हॉस्पिटल, देगलूर)
३ डॉ. योगेश पत्तेवार (MBBS, D Ortho) – अस्थिरोग (हाडांचे) तज्ज्ञ
(पत्तेवार हॉस्पिटल, देगलूर)
४ डॉ. सचिन मंतावार (MBBS, MS) – नेत्ररोग तज्ज्ञ
(मंतावार हॉस्पिटल, देगलूर)
५ डॉ. प्रियंका मंतावार (MBBS, MS) – कान–नाक–घसा तज्ज्ञ
(मंतावार हॉस्पिटल, देगलूर)
६ डॉ. प्रमोद सुरकुटलावार (MDS) – दंतरोग तज्ज्ञ
(अधियोग हॉस्पिटल, देगलूर)
७ डॉ. प्रणिता हलगे (MBBS, MD) – पॅथॉलॉजिस्ट (रक्त तपासणी तज्ज्ञ)
८ डॉ. श्रीराम बिरादार (BAMS)
९ डॉ. किरण सखाराम ठाकरे (समुदाय आरोग्य अधिकारी – उकज)
(उपकेंद्र येरगी–होट्टल)
१० डॉ. सुहासिनी जायेवार (MBBS) – वैद्यकीय अधिकारी, होट्टल

# ग्रामीण रुग्णालयात नवीन एक्स–रे मशीन सह आर्थोपेडिक सर्जन ची नियुक्ती करा

## काढलेल्या एक्सरेत जखमा फ्रॅक्चर दिसत नसल्याने रुग्णांना खाजगी एक्स–रे सेंटरचा घ्यावा लागतो आधार

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

माहूर शहरातील ग्रामीण रुग्णालयात शासनाकडून बसविण्यात आलेली एक्स–रे मशीन जुनाट झाल्याने या मशीनमध्ये काढलेले फ्रॅक्चर किंवा इतर जखमा दिसत नसल्याने रुग्णांना खाजगी एक्स–रे सेंटरचा आधार घ्यावा लागत असून जास्त प्रमाणात फ्रॅक्चरअसल्यास पुसद यवतमाळ येथे जाऊन महागडे उपचार घ्यावे लागत असल्याने आर्थिक फटका बसत असून जिल्हा शल्य चिकित्सकांनी तात्काळ नवीन एक्सरे मशिन बसवून ऑर्थोपेडिक सर्जन ची नियुक्ती करून गोरगरीब रुग्णांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे



माहूरच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये सध्या आर व्ही एक्स–रे मशीन असून ऑर्थोपेडिक सर्जन नाही महिनाभरात किमान ३०० वर रुग्ण माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात एक्स–रे करण्यासाठी येतात परंतु येथील एक्स–रे मशीन मध्ये काढलेले फोटो देण्यात येत नसल्याने फक्त स्क्रीनवर दाखवून सरळ हातात रेफर लिटर दिले जाते तर या मशीनवर काढलेला एक्स–रे चा रिपोर्ट तिसऱ्या दिवशी येत असल्याने रुग्णांनी मरावे काय असा सवाल उपस्थित होत असून येथे साधे फ्रॅक्चर किंवा हाडाला दुखापत झाल्याचेहि प्लास्टर होत नसल्याने एक्स–रे मशीन असून काहीच फायदा नाही अशी ओरड होत आहे त्यामुळे डीआर सिस्टम ची मशीन तात्काळ येथे पाठवत आर्थोपेडिक सर्जनची नियुक्ती होणे गरजेचे आहे

गडावर आलेल्या भाविकांच्या वाहनांना अपघात होऊन शेकडो भाविक दगावलेले आहेत तर सोबतच हजारो भाविकांना मार लागून गंभीर फ्रॅक्चर होतात त्यावर पृष्ठ बँडेज लावून तात्पुरती फिटिंग करून सरळ यवतमाळ रेफर केले जाते त्यामुळे येथे ट्रॉमा केअर सेंटरची नितांत गरज असतानाही लोकप्रतिनिधी याकडे गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्ष करत आहे त्यामुळे येथे तात्काळ अद्यावत मशीन सह आर्थोपेडिक सर्जनची नियुक्ती करावी अशी मागणी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष तथा पत्रकार इलियास बावाणी यांनी केली आहे

## नवनिर्वाचीत जिल्हा परीषद सदस्य तानाजीराव जाधव यांनी घेतली सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांची सदिच्छा भेट



दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लातुर जिल्यात महाविकास आघाडीला मीळालेल घवघवित यश व खरोसा जिल्हा परिषद गटातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना(उ.बा.ठा) पक्षाचे निष्ठावंत शिवसैनिक तानाजीराव जाधव यांनी खरोसा जिल्हा परिषद निवडणूक लढवली व यामध्ये खरोरा गटातील मतदारांनी मतदान रुपी आशीर्वाद देऊन तानाजीराव जाधव यांना चांगल्या मताधिक्याने निवडून दिले ,त्यामुळे काल बाभळगाव येथे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख . लातूर शहराचे माजी मंत्री आ.अमित भैया देशमुख . लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन तथा माजी आ. धीरज भैया देशमुख यांचे अभिनंदन करून पुष्पगुच्छ देऊन त्यांना त्यांचा सत्कार करण्यात आला .यावेळी सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख व आमदार अमित भैया देशमुख यांनी तानाजीराव जाधव यांचे विशेष अभिनंदन सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, व खरोसा जिल्हा परिषद गटातील मतदारांनी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाचं व मिळालेल्या संधीचं लोकांचे सेवा करून व मतदार संघात विकास कामे करून मिळालेल्या संधीचं सोनं करावं असं यावेळी सांगितले,

यावेळी काँग्रेस प्रदेशचे सचिव श्री शैल्य उटगे,काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके, औसा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण बापू बाबळसुरे ,युवक विधानसभा अध्यक्ष संजय लोंढे, कार्याध्यक्ष बाळासाहेब सांगवे .श्री संत शिरोमनी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे संचालक विलास काळे , उद्धवजी गोरे, नवनिर्वाचित खरोसा पंचायत समिती सदस्या शितलताई फावडे, विष्णू फावडे ,अशोकराव खरपडे, अक्षय खरपडे ,अमिर पटेल सह काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनेगाव येथे उसाला लागली भीषण आग आगीमध्ये सरासरी सहा एकर ऊस जळून खाक

दैनिक वादळ वार्ता
**वलांडी । प्रतिनिधी**

दिनांक १२ फेब्रुवारी रोजी दुपारी १:०० वाजता दत्तू सोपान बिरादार, शिवाजी निवृत्ती बिरादार आणि सुभाष निवृत्ती बिरादार सर्वे नंबर १४/१ या शेतकऱ्याच्या शेतजमीन धनेगाव – हेळंब रस्त्यालगत आहे ऊसाला लागली भीषण आग आगीमध्ये शेतकऱ्यांची पाईप शेतात लागणारे अवजारे ई.मोठे नुकसान झाले आगीचे कारण अद्यापही कळाले नाही आग एवढी भीषण होते की आग वीजवणे शक्य नव्हते शेतकऱ्याच्या हातात तोंडाला आलेला घास आगीमुळे झाले जळून खाक या नुकसान बद्दल आजूबाजूचे शेतकरी हळहळ व्यक्त करत आहेत



## राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी जि.प.अध्यक्षा भाग्यश्री ताई हलगेकर यांची प्रमुख उपस्थिती;इंजिनियर मयूर पुप्पालवार यांच्या विवाह सोहळ्यात शुभेच्छांचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

मा. प्रकाशजी पुप्पालवार यांचे एकमेव सुपुत्र चि. मयूर पुप्पालवार (सिव्हिल इंजिनियर) यांच्या विवाह सोहळा अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात संपन्न झाला. या मंगल प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा भाग्यश्री ताई हलगेकर यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. तसेच युवा नेते मा. ऋतुराज हलगेकर यांनीही उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली.

मान्यवरांच्या हस्ते नवविवाहित दाम्पत्याला शुभ आशीर्वाद देण्यात आले. भाग्यश्री ताई हलगेकर यांनी नवदाम्पत्यास उज्ज्वल, सुखी



आणि समृद्ध वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवर, नातेवाईक व मित्रपरिवार यांनीही नवदाम्पत्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

सोहळा आनंदी आणि उत्साही वातावरणात पार पडला असून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून पुप्पालवार कुटुंबियांचे अभिनंदन केले.

# जेतवन बुद्ध विहारात त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार मालेवाडा येथे दि.७ फेब्रुवारी २०२६ ला त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने सकाळी ९.३० वाजता रॅलीचे आयोजन करण्यात आले.त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची मिरवणूक गावातील मुख्य रस्त्याने प्रस्थान करत जि.प.शाळा, ग्रा.प, छत्रपती शिवाजी चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून मार्गातील सर्व महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादन करीत बुद्ध विहारात तिची सांगता झाली. कार्यक्रमाची सुरुवात तथागतांच्या मूर्तीला, क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन व पुष्पमाला अर्पण करुन करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी



मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाची अध्यक्षा प्रा.प्रणाली टेंभुर्णे मॅडम व गु. से. मं. चे मा. चरणदासजी पोईनकर यांनी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाला खऱ्या अर्थाने खंबीरपणे साथ देणाऱ्या,बाबासाहेबांना घडविणाऱ्या त्यांच्या पत्नी माता रमाई यांनी प्रचंड हाल अपेष्टा सहन करुन बाबासाहेबांच्या कुटुंबाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.या मातेने आपल्या इच्छा – आकांक्षाना मूठमाती देऊन बाबासाहेबांना समाजहीतासाठी लढण्यास प्रोत्साहित केले.माता रमाई बाबासाहेबांच्या आयुष्यात आल्या नसत्या तर एवढ्या प्रचंड विद्वतेचा निस्वार्थ नेता कधीच घडला नसता,अशा शब्दात मान्यवरांनी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.मंगला धारणे मॅडम व प्रा. डॉ.संदीप सातव सर,प्रा. डॉ.बिजनकुमार शील सर, श्रीरामजी खाडे , जि. प. शाळेचे मुख्याध्यापक गुलाब पंधरे सर व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या रामटेके यांनी केले.व आभार मीनाक्षी गजभिये यांनी मानले. कार्यक्रमाला बौध्द पंच कमेटी,भीमज्योती महिला मंडळ,ग्राम पंचायत पदाधिकारी,शाळेचे शिक्षक – रा.से.यो. स्वयंसेवक, स्वयंसेविका,विद्यार्थी,उपासक – उपासिका ,व गावातील नागरिक उपस्थित होते.

# स्कूल ऑफ स्कॉलरचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अभ्यास दौरा



दैनिक वादळ वार्ता
**आरमोरी । प्रतिनिधी**

वत्सला बाई वनमाळी स्कूल ऑफ स्कॉलर, आरमोरी येथील विद्यार्थी यांनी आज दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी नगर परिषद कार्यालय तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे अभ्यास दौर्यासाठी भेट दिली. या वेळी त्यांना नगर परिषद कार्यालयाच्या कार्यपद्धतीबाबत तसेच घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रमामध्ये नगर परिषदेचे अध्यक्ष रूपेश पुणेकर यांच्या हस्ते विद्यार्थी व शिक्षिकांना भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन गौरविण्यात आले. तसेच या प्रसंगी नगरसेवक अक्षय हेमके, कार्यालय अधीक्षक प्रीतेश काटेखाये, स्वच्छता निरीक्षक श्रीमती नितेश सोनवाने, शहर समन्वयक शहेराज पठाण, लिपिक राजु कांबळे इत्यादी उपस्थित होते.

## पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा भावनिक निरोप समारंभ

# विद्यार्थ्यांची ओळख त्यांच्या अभ्यासातूनच होते-तहसीलदार राकेश गिड्डे

**केज येथील नामांकित पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ अत्यंत भावनिक व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात केजचे तहसीलदार तथा दंडाधिकारी राकेश गिड्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रेरणादायी विचार मांडले. तहसीलदार गिड्डे म्हणाले, विद्यार्थ्यांची खरी ओळख ही त्यांच्या अभ्यासातूनच होते. अभ्यासाशिवाय विद्यार्थ्यांना कोणताही पर्याय नाही. आई–वडील मुलांना मारतात, शिस्त लावतात; परंतु त्याच शिस्तीतून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडते. आई–वडील हेच आपले पहिले गुरु असतात. परिस्थिती बदलण्यासाठी दुसरे कोणी येणार नाही, तर स्वतःलाच परिस्थिती बदलावी लागते, असे भावनिक मार्गदर्शन त्यांनी केले.**

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष खंडेराव चौरे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य अशोक मस्के, घुले सर, अश्विनी मॅडम, पठाण सर, मगर सर, काळे सर, विशाल सर, चौरे मॅडम, मुळे मॅडम, पारखे मॅडम, दळवी मॅडम आदी शिक्षक उपस्थित होते. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना भावनिक निरोप दिला. त्यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतात शाळेतील आठवणी, शिक्षकांचे मार्गदर्शन व मैत्रीचे क्षण व्यक्त करत भावना अनावर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी सुदेशना गायकवाड हिने केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी अस्मिता हिने मानले. या निरोप समारंभास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.




## शर्वरी भोजने हिचा वाढदिवस साजरा; गरजूंना अन्नदानाचा उपक्रम




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

निलेश भैय्या साखरे यांची पुतणी तसेच श्वेताली व पंकज भोजने यांची कन्या शर्वरी हिचा वाढदिवस दि. ११ फेब्रुवारी रोजी उत्साहात व थाटामाटात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
या प्रसंगी केक कापून शर्वरी हिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.
शर्वरी हिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी उपस्थितांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे आयोजन कुटुंबीयांच्या वतीने अत्यंत आनंदी व आपुलकीच्या वातावरणात करण्यात आले.

## साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी चौरे प्रांजली हिला बेसबालमध्ये कांस्यपदक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**


नवी दिल्ली येथे झालेल्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.चौरे प्रांजली चंद्रसेन हिला कांस्यपदक मिळाले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाला कांस्यपदक प्राप्त झाले.कांस्यपदक प्राप्त विद्यार्थ्यांनी कु.चौरे प्रांजली हिचा सत्कार बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या वेळी प्राचार्य डॉ.कविता गित्ते कराड मॅडम,संस्थेचे उपाध्यक्ष राजेश कापसे सर,तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.




## अविनाश मुडेगांवकर यांना सुवर्णरत्न पत्रकारिता पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संकल्प विद्या प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने दिला जाणारा सुवर्ण रत्न पत्रकारिता पुरस्कार अंबाजोगाई येथील दै. लोकमतचे तालुका प्रतिनिधी अविनाश मुडेगांवकर यांना जाहीर झाला आहे.संकल्प विद्या प्रतिष्ठान ही शिक्षणक्षेत्रात विशिष्ट ध्येयाने कार्य करणारी संस्था असून या संस्थेच्या वतीने गेल्या तेरा वर्षापासुन विविध क्षेत्रातील मान्यवरांना सुवर्ण रत्न पुरस्कार प्रदान केले जातात.या वर्षी सुवर्ण रत्न पत्रकारिता पुरस्कार दैनिक लोकमत चे अंबाजोगाई येथील प्रतिनिधी अविनाश मुडेगावकर यांना जाहीर झाला आहे.मान्यवरांच्या उपस्थितीत हा सुवर्णरत्न पुरस्कार वितरण सोहळा २८ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रेखा बडे,सचिव कैलास चोले यांनी सांगितले.अविनाश मुडेगांवकर हे बऱ्याच वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेतील कै.अनंतराव भालेराव स्मृती पत्रकारिता पुरस्कार,स.मा.गर्गे पत्रकारिता पुरस्कार या मोठया पुरस्कारासह अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. दै.लोकमत मधील अनेक सन्मानाचे पुरस्कार त्यांनी प्राप्त केलेले आहेत. अविनाश मुडेगांवकर यांच्या पत्रकारितेची सुरुवात दै.सर्वसाक्षी पासुन झाली.पुढे त्यांनी दै.अजिंठा, दै.विवेकसिंधु,गांवकरी,सोलापुर तरुण भारत व लोकमत असा त्यांचा प्रवास राहिला. गेल्या २० वर्षांपासून लोकमत या अग्रगण्य दैनिकामध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे.शिवाय सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक,सांस्कृतिक कार्यातही त्यांचा हिरीरीने पुढाकार असतो.अविनाश मुडेगांवकर यांना जाहीर झालेल्या या पुरस्कारा बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## तोरण्यात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवतकथा

दैनिक वादळ वार्ता
**बिलोली । हनुमंत चंदनकर**

बिलोली तालुक्यातील तोरणा येथे श्रीमद् भागवत भक्तीचा महिमा श्रोत्यांस श्रवणास मिळणार असून भागवताचार्य कृष्णा महाराज राजूरकर यांच्या अमृतवाणीतून भागवत कथा अन् सतत आठ दिवस अखंड हरिनाम सप्ताह नामसंकीर्तन सोहळ्याची मांदियाळी चालणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याच्या आवाहन येथील सप्ताह कमिटीने केले आहे.तालुक्यातील तोरणा येथील ग्रामदैवत मारोती मंदीर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनाच्या निमित्ताने श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे १४ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाची मांदियाळी चालणार असून, रोज दुपारी एक ते चार यावेळेत भागवताचार्य कृष्णा महाराज राजूरकर यांच्या अमृतवाणीतून श्रीमद् भागवत कथेचा आस्वाद श्रोत्यांना मिळणार आहे. या सोहळ्यातील कीर्तन कार्यक्रम १४ फेब्रुवारी रोजी वैभव महाराज गुजरीकर, १५ रोजी रुद्रगीर महाराज किवळेकर, १६ रोजी मच्छिंद्रनाथ महाराज धानेपकर, १७ रोजी श्रीधर महाराज कासराळीकर, १८ रोजी दत्ता महाराज वळसनवाडीकर, १९ रोजी अनिल महाराज भाद्रेकर, २० रोजी रोहिदास महाराज कळकेकर तर २१ रोजी कृष्णा महाराज राजूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. तरी तोरणा व परिसरातील भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन सप्ताह कमिटी व ग्रामस्थांनी केले आहे.

## ज्ञानप्रबोधिनी शाळेतील आनंद नगरीस विद्यार्थी पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील फुलेनगर येथील अजिंक्यतारा संस्थेची ज्ञानप्रबोधिनी प्राथमिक विद्या मंदिर शाळेत बाल आनंद मेळावा म्हणजेच आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते.यात ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ३० स्टॉल उभारले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन नालंदा विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.यावेळी नगरसेवक कपिल मस्के,संपादक अजय भांगे,विलास भिसे यांची उपस्थिती होती.आनंद नगरीस केजच्या नगराध्यक्षा सीता बनसोड, राजर्षी शाहू शाळेच्या मुख्याध्यापिका बी.बी.चाटे,जय भवानी शाळेच्या मुख्याध्यापिका जगताप मॅडम यांच्यासह अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन बालकांचा उत्साह वाढविला.विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यवहारीक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते. यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा म्हणून आनंद नगरीचे आयोजन केल्याचे शाळेचे मुख्याध्यापक दयानंद देशमुख म्हणाले. आनंद नगरीत बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेकडून यावेळी विद्यार्थ्यांना टेबलची व्यवस्था करून दिली होती यावर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ बनवून विक्रीसाठी मांडले होते.अतिशय नियोजनबद्ध आयोजित कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक तसेच शाळेचे हितचिंतक मित्रपरिवार उपस्थित होते.आनंद नगरीमधून विद्यार्थ्यांना खरेदी–विक्री कशी होते हे समजून आले तसेच स्वकष्टांतून कमाईचे महत्त्व समजले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांचा पालक व मित्रपरिवाराने आस्वाद घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक दयानंद देशमुख, शिक्षक जी.बी. रहाणे,एस. व्ही.जाधव,ए. बी.चाळक,ए. यू.थोरात,शिक्षिका एस.एम. कुलकर्णी,यु.जी. बडे, समुद्रे मॅडम व साळवे मॅडम यांनी मेहनत घेतली. शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी आनंद नगरीचा आनंद लुटला.



## विडा,सारणी सांगवी येथील बी एस एन एल नेटवर्क सेवा वारंवार खंडित होणारी सुधारित करा–ढाकणे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे जोला व पंचक्रोशीतील बी एस एन एल मोबाईल नेटवर्क सेवा गेल्या काही महिन्यापासून वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विडा आणि सारणी (सांगवी) या दोन्ही ठिकाणी बी एस एन एल चे टॉवर असुन दोन्ही ठिकाणचे बी एस एन एल चे टॉवर दोन- दोन दिवस नेटवर्क रेंज पूर्णपणे बंद पडणे, नेटवर्क दिसत असतानाही इंटरनेट बंद पडणे, कॉल न लागणे व कॉल ड्रॉप होणे यासारख्या गंभीर तांत्रिक समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.या समस्येचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला, बँक व डिजिटल व्यवहारांना, व्यापारी उलाढालींना तसेच आरोग्य व शासकीय सेवांना बसत आहे. इंटरनेट सेवा ठप्प झाल्याने ऑनलाईन पेमेंट, पैसे ट्रान्सफर व सरकारी पोर्टलवरील कामे ठप्प झाल्याचे नागरिकांनी सांगितले.
या पार्श्वभूमीवर बी एस एन एल कंपनीने तातडीने नेटवर्क सेवा सुरळीत करावी, कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात व तांत्रिक अडचणी दूर कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.
बी एस एन एल कंपनीच्या ढिसाळ सेवेविरोधात ग्रामस्थांनी बहिष्काराचा निर्धार व्यक्त केला असून अनेक युवकांनी आपली बी एस एन एल सिमकार्डे इतर कंपन्यांकडे पोर्ट करण्यास सुरुवात केली आहे. तातडीने सेवा सुधारली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पंचक्रोशीतील नागरिकांनी दिला आहे.



## जिओचे नेटवर्क गुल लग्नसराई नातेवाईकाचे हाल तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान

दैनिक वादळ वार्ता
**वाघाळा । प्रतिनिधी**

लोकनेता न्यूज वाघाळा परिसरात रिलायन्स जिओ क्षळे कंपनीची सेवा गेल्या गेल्या दोन दिवसापासून अचानक कोलमडल्याने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे आज लग्नाचा मोठा मुहूर्त असतानाच नेटवर्क गायब झाल्याने वऱ्हाडी मंडळींनी एकमेकांशी संपर्क साधताना अतोनात त्रास सहन करावा लागला सकाळी ६ वाजेपासून बंद पडलेले नेटवर्क सकाळपर्यंत दुरुस्त न झाल्याने ग्राहकांनी तीव्र संताप व्यक्त केला आज लग्नाची मोठी तीथ असल्याने परिसरात मोठी वर्दळ होती मात्र नातेवाईकाला नेटवर्क नसल्याने पाहुण्यांची लोकेशन मिळवणे मंगल कार्यालयातील लोकांशी संवाद साधने आणि नातेवाईकांची संपर्क करणे अशक्य झाले अनेक महत्त्वाचे निरोप वेळेवर न पोचल्याने लग्नकार्यात मोठा गोंधळ उडाला डिजिटल व्यवहार झाले व्यापारांचे णश्रि आणि ऑनलाइन पेमेंट वर अवलंबून आहेत नेटवर्क नसल्याने दुकानावर स्कॅन आणि पेमेंट मशीन बंद पडल्यामुळे सकाळपासून व्यापाऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून ग्राहकांनी रिकाम्या हाती परतावे लागले नेटवर्क अभावी परिसरात बँक आणि नेट मधील पूर्णपणे शासकीय कामासाठी आलेल्या नागरिकांना याचा फटका बसत आहे दिवसभर तटकाळ उभे राहून अखेर माघारी फिरावे लागत असून वाघाळा परिसरात जिओची तांत्रिक अडचण त्वरित दुरुस्त करावी महागडी रिचार्ज करून पूर्णपणे जिओची सेवा मिळत नसून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे लवकरात लवकर जिओ सेवा चालू व्हावी अशी मागणी गावातील नागरिक करत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077